# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL


## SPECIAL ISSUE

On the Occasion of One Day National Conference On

# WOMEN EMPOWERMENT IN ANCIENT TO MODERN PERIOD

27th January, 2018

(Book I)



*Editor*

**Mr. Pawde K. W.**

*Principal*

**Dr. A. D. Mohekar**

## 20.

# हैद्राबाद मुक्ती आंदोलानातील माहितीचे योगदान

**प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव**
(इतिहास विभाग प्रमुख)
बलभीम महाविद्यालय, बीड
मो.नं. ९४२१३५०८७३

### प्रस्तावना

भारत देश हा जगाच्या नकाशावरील एकमेव देश असा आहे की, या देशाची अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान होती आणि आहे. या खंडप्राय देशावर अनेक पाश्चिमात्यांची सातत्याने आक्रमणे होत होती. त्यांच्या आक्रमणाला हा देश बळी पडत गेलेला आहे. त्याची अनेक उदाहरणे आपणास देता येतात. प्राचीन माध्ययुगीन आणि आधुनिक अशा तीन कालखंडाचा आपण विचार केला तर असे स्पष्ट होते की, आधुनिक कालखंडाचा अपवाद वगळता प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडात तर या देशावर परकीयांचे वर्चस्व वर्चस्व होते. त्यामध्ये प्रामुख्याने मोगल, सुलान या शिवाय इतर पाश्चिमात्यांचाही उल्लेख करावा लागतो. परंतू प्रारंभीच्या काळात ज्यानी भारतावर आक्रमणे केली. येथील भूभाग जिंकून घेतला आणि काही काळ वर्चस्व प्रस्थापित केले पण त्याचे वर्चस्व फार काळ टिकून राहिले नाही. हे आपणास युरोपीयनाच्या संदर्भात म्हणता येते. म्हणजे काही देश सर्वप्रथम भारतात आले पण फार काळ सत्ता टिकवून ठेवू शकले नाहीत. त्यामध्ये डच, पोर्तुगीज याशिवाय इतर पाश्चिमात्यांचा उल्लेख करावा लागतो.

परंतू सर्वांच्या शेवटी ज्यानी भारतीय भुमीत प्रवेश केला ते इंग्रज मात्र हातामध्ये तराजू आणि तागड घेवून आले. आणि पहाता पहाता या देशाचे राज्यकर्ते बनले, हे आपणास लपवून ठेवता येणार नाही. इंग्रजानी बंगाल आणि इतर प्रांतातून आपल्या वर्चस्वाला सुरुवात करून अल्पावधीतच संपूर्ण देशात आपली सत्ता प्रस्थापित केली आणि सर्व हिंदू संस्कृती ही पारतंत्र्यात गेली. ती एक किंवा दोन वर्ष नाही तर जवळपास दिडशे वर्ष इंग्रजानी या देशावर राज्यकारभार केला. या काळात त्यांनी फोडा आणि झोडा या नितीचा अवलंब करून भारतीय समाज एकमेकापासून वेगळा केला. हिंदू - मुस्लीम यांच्यात एकमत ठेवले नाही. त्यामुळे त्यांच्या सत्तेची पाळेमुळे अगदी खोलवर या देशात रुजली होती. त्यांच्या या अस्तित्वाला सुरुंग लावण्यासाठी अनेक भारतीय विचारवंतांनी क्रांतीकारकांनी समाजसुधारकांनी प्रयत्न केले पण त्यांच्या प्रयत्नाला फार काळ यश आले नाही. एकंदर इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्यासाठी आधुनिक कालखंडात अनेक हिंसक व अहिंसक चळवळी घडून आल्या होत्या. पण त्या चळवळी इंग्रजानी अगदी खंबीरपणे दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांचे सर्व प्रयत्न १५ ऑगस्ट १९४७ रोजी निष्फळ ठरून भारत पारतंत्र्यातून स्वतंत्र झाला. पारतंत्र्याच्या काळात या देशात जे स्वतंत्र संस्थानिक होते. त्या संस्थानिकापैकी हैद्राबादचा निजाम आपले अस्तीत्व काय ठेवून राज्यकारभार करत होता. त्याच्या काळात या संस्थानातील म्हणजे मराठवाड्याच्या सर्व भागावर निजामाचे वर्चस्व होते. त्यामुळे हिंदूची वाटेल, त्या पध्दतीने तो पिळवणूक करत असे. त्यांच्या या धोरणाला संस्थानातील हिंदू लोकानी विरोध केला. एवढेच नाही तर हिंसक चळवळी घडवून त्याचे साम्राज्य अस्थीर करण्यासाठी हिंदू समाज संघटीत झाला. त्यामुळे अनेक महापुरूषांचा उल्लेख करावा लागतो एकंदर १५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत म्हणजे मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळेपर्यंत हैद्राबाद संस्थानिकाच्या विरोधात या संस्थानातील पुरूषांनी तर संघर्ष केलाच परंतू स्त्रीयांची कामगिरी सुध्दा या आंदोलनात दखल घेण्यासारखी होती. त्यापैकी निवडक स्त्रीयांची कार्य खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

### आशाताई वाघमारे :

मराठवाड्याच्या आंदोलनावर चर्चा करण्यासाठी व पुढील दिशा ठरवण्यासाठी मराठवाड्याच्या वेगवेगळ्या जिल्ह्यात महाराष्ट्र इतिहास परिषदेची अधिवेशन घेत होती. एकंदर १९३७ मध्ये परतूरला हे अधिवेशन झाले तेंव्हा सुरु असलेल्या स्वातंत्र्य संग्रामात पुरुषाप्रमाणेच स्त्रीयांना सुध्दा सहभागी करून घ्यावे अशी मागणी आशाताईनी स्वामीजीकडे केली होती. कारण त्यांचे पती तेथील वास्तव पाहून त्यांनी वेगवेगळ्या वृत्तपत्रातून अन्यायास वाचा फोडली. आशाताई अतिशय कणखर विचारांची महिला होत्या. त्या जेव्हा आंदोलनात सहभागी झाल्या. तेंव्हा त्यांच्याकडे शस्त्रास्त्रांची ने-आण करण्याची जबाबदारी सोपवली होती. यासाठी त्यांना चार महिन्याची शिक्षा ठोठावण्यात आली होती. शिक्षा भोगत असताना त्यानी तुरूंगातच कैद्यासाठी साक्षरतेची मोहीम सुरु केली. एवढेच नाही तर हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाच्या नंतर सुध्दा त्यांनी शैक्षणिक, सामाजिक व अन्य कार्यात मोठ्या प्रमाणावर योगदान दिल्याचे दिसून येते.

### दगडाबाई शेळके :

दगडाबाई शेळके यांचे वास्तव्य अगदी ग्रामीण भागात होते. पण त्यांना सुध्दा मराठवाड्याच्या स्वातंत्र्य आंदोलनाचा मोठा रोग जडला होता.मराठवाड्यात जेंव्हा हा संघर्ष सुरु होता. तेंव्हा त्यांनी शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण घेतले. स्वसंरक्षणासाठी त्या सातत्याने तलवार बाळगत असत स्वातंत्र्य आंदोलनातील कठीणातील कठीण कामे सुध्दा पुरुषाच्या समवेत दगडाबाई करत असत. मग रेल्वे रुळ उखडणे, पोलीस

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

चोवत्ता, छावण्या उध्वस्त करणे, या कामात त्या सक्रीय होत्या. आशाताई वाघमारेंच्या कार्याने प्रभावीत होऊन दगडाबाई भाषणे देऊ लागल्या. जेव्हा संस्थानावर पोलीस कारवाई झाली तेंव्हा दगडाबाई कंधार तालुक्यात केशवराव कानवटकर यांच्यासोबत काम करत होत्या. जेव्हा पोलीस कारवाई सुरु झाली तेंव्हा संस्थानातील नागरीक फार घाबरले होते. पण दगडाबाईने मात्र खेड्यापाड्यात फिरून जनतेला धीर देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नागरीकांचे मनोबल वाढले होते.

**सुशीलाबाई दिवान :**

राघवेंद्र दिवाण हे हैद्राबाद आंदोलनातील महत्वाची व्यक्ती त्यांच्या समवेत सुशीलाबाई दिवाण यांनी सुध्दा फार योगदान दिले. लातूर आणि इतर भागातल्या स्त्री यांना एकत्र आणणे. त्यांचे मेळावे घेणे. नवनवीन विचार त्यांच्यासमोर मांडणे अशी विविध कामे त्यांनी केली. त्यांनी निजाम विजय या वृत्तपत्रातून पुरोगामी विचारांचा प्रसार केला. महाराष्ट्र परिषदेचे लातूर येथील अधिवेशन यशस्वी करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. काशीताई किर्लोस्कर या अधिवेशनाच्या अध्यक्षा होत्या. त्यामुळे त्यांनी खूप परिश्रम घेतले होते. काही वेळा महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाची धुरा सुध्दा तयांनी सांभाळली होती. त्यामुळे सामान्य स्त्रीयांना प्रेरणा मिळत असे.

**राजकुंवरबाई काबरा :**

दगडाबाई शेळके, आशाताई वाघमारे, सुशिलाताई दिवाण यांच्या शिवाय काबरा ताईंचे व्यक्तिमत्व वेगळे होते. त्या राष्ट्र सेवादलात वाढल्या होत्या. त्यामुळे कोणत्याही पक्षाचे वातावरण तयार करणारी महिला म्हणून त्यांच्या नावाचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी नाशिक सेवादलाच्या महिला विभागाच्या प्रमुख शिवाय जिल्हा प्रमुख म्हणून काम केले. हैद्राबाद आंदोलन सुरु झाल्यामुळे शस्त्रास्त्राची जमवा जमव सुरू झाली. तेंव्हा काबराबाईचे कार्य महत्वाचे ठरले. कारण पुणे, कलकत्ता, जबलपूर येथून संस्थानात शस्त्र पाठवण्याचे काम त्या करत होत्या. याशिवाय आंदोलनासाठी तरूणांची तगडी फळी तयार करण्याचे महत्वाचे कार्य हे राजकुंवरबाईनी केले. कालांतराने हे आंदोलन संपले आणि मराठवाड्यास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काबराबाईनी शारदा मंदिर या शाळेत नोकरी स्विकारली: विविध विधायक कामे हाती घेतली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत योगदान दिले. महिला मंडळ ही पहिली महिलांची संघटना त्यांनीच औरंगाबाद येथे स्थापन केली. त्यामुळे मराठवाड्याच्या आंदोलनात त्यांचे मोठे योगदान आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.

**प्रतिभाताइ वैशंपायन :**

हैद्राबाद आंदोलनातील प्रतिभाताईचे कार्य हे अविस्मरणीय कार्य होते. निजामच्या संस्थानमध्ये म्हणजे हैद्राबाद येथे प्रतिभाताई आणि ताराबाई परांजपे यांनी घरोघरी जाऊन झेंडे लाणे, सत्याग्रह करणे, पत्रके वाटणे, अशी विविध कामे हाती घेऊन भाऊसाहेबांच्या खांद्याला खांद्या लावून काम केले. पोलीस ॲक्शन संपल्यानंतर त्यांनी शारदा मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून काम केले हे करत असताना अनेक सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात त्या आघाडीवर होत्या. म्हणूनच एक शिस्तप्रिय, शांतवृत्तीच्या महिला कार्यकर्ती म्हणून हैद्राबाद आंदोलनातील त्यांचे कार्य महत्वाचे समजले जाते. त्यांच्या सहभागामुळे मुक्ती आंदोलनाला वेगळी दिशा प्राप्त झाली होती, असे नमूद केले जाते.

**गीताबाई चारठाणकर :**

हैद्राबाद संस्थाना सत्ताधिश निजामाविरुध्द ज्यावेळेस वेगवेगळी आंदोलने चालु होती. त्यावेळेस आंदोलनात सहभागी होऊन गीताबाई चारठाणकर यांनी पत्रके वाटणे, सत्याग्रहीना मदत करणे, त्यांना निधी पुरवणे, अशी अनेक कामे गीताबाई चारठाणकर करत होत्या. परंतू कालांतराने लढा तिव्र होत गेला. तेंव्हा मात्र त्यांनी स्वतःला सशस्त्र लढ्यामध्ये झोकून दिले. मंठा येथील पोलीस ठाण्यावर हल्ला करण्याचे जेंव्हा नियोजन झाले तेंव्हा त्यासाठी लागणारी शस्त्रास्त्रे, हल्लेखोराना पुरवण्याचे अगदी खंबीर काम त्यांनी केले. त्यामुळे संपूर्ण मराठवाडा विभागात त्यांना एक खंबीर कार्यकर्ती महिला म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. त्यांनी समाजासाठी जे काम केले. त्या कामाची पावती किंवा उत्तराई म्हणून महाराष्ट्र शासनाने १९६६ मध्ये त्यांना वीर महिला सुंदराबाई भोपटकर या पारितोषीकाने सन्मानित केले. या मुक्ती आंदोलनात सर्वस्व झोकून देऊन सहजीवन जगणारे एक आदर्श जोडप म्हणून श्री. विनायकराव चारठाणकर व श्रीमती गीताबाई चारठाणकर यांच्याकडे लक्ष केंद्रीत होते.

अशा रितीने स्वामीजींच्या सोबत हैद्राबाद मुक्ती आंदोलनात निष्ठेने काम करणारे किती तरी स्त्री-पुरूष होते. पण येथे काही निवडक स्त्रीयांच्या कार्याची माहिती घेतलेली आहे.

**संदर्भ**

१. डॉ. रोडे सोमनाथ मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद.
२. कमल भागवत व इतर - स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे १९९०.
३. सुलभा धारुरकर - हैद्राबाद मुक्तीलढा व महिलांचे योगदान.
४. शिवाजी सगर /कांचन सगर- थोर क्रांतीकारक महिला, अरुणा प्रकाशन, लातूर -२०१३.
५. वा.ना. कुबेर - भारताचा स्वातंत्र्य लढा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ, मुंबई-२००२.
६. नवाझ ब. मोदी - भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया, अनु.वासंती फडके, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे ३ २

❑❑❑